# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई
# प्रेसनोट

CB/57/2025

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ३१.१०.२०२५**

**''वेश्याव्यवसायतुन अल्पवयीन मुलीची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

.................................................................................................................................................

मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत दिनांक ३०/१०/२०२५ रोजी ''कोपरागाव, खारघर परिसरातील एक महिला ही तिच्या अंदाजे वय १० ते १२ वर्षे असलेल्या लहान मुलीस, तळोजा फेज ०२ परिसरातील एका इसमाकडे वेश्याव्यवसायासाठी रात्री पाठवत असुन सकाळी घरी परत घेवुन येत असल्याबाबत खात्रीलायक बातमी मिळाली ''.

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे पथकासह दिनांक ३०/१०/२०२५ रोजी सकाळी रूम नंबर ३०२, प्लॉट नंबर २३, सेक्टर २०, एकता डेव्हर्लपर, तळोजा फेज ०२, तळोजा, याठिकाणी कारवाई केली असता एक पिडीत अल्पवयीन मुलगी अ.ब.क, वय १० वर्षे, रा.खारघर हिच्या सोबत आरोपी फारूक अल्लाउददीन शेख, ७० वर्षे, रा.रूम नंबर ३०२, प्लॉट नंबर २३, सेक्टर २०, एकता डेव्हर्लपर, तळोजा फेज ०२, तळोजा, मुळ रा.लंडन याने नमुद ठिकाणी पिडीत अल्पवयीन मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असुन सुध्दा तिला मदय पाजुन तिच्या सोबत दिनांक २७/१०/२०२५ ते २८/१०/२०२५ रोजी व मागील ०२ वर्षामध्ये अनेक वेळा जबरदस्तीने लैगिंक अत्याचार केले. सदर बाबत कोठे वाच्यता केल्यास मारून टाकण्याची धमकी दिली. तसेच पिडीत हिची आई नुरबी अफसर अन्सारी, वय ३० वर्षे, रा.रूम नंबर ३०३, डायमंड हेरिटेज, तिसरा माळा, सेक्टर १०, कोपरागांव, खारघर हिस भाडयाने घर घेण्यासाठी वरील आरोपी फारूक शेख याने तिला अडीच लाख देवुन व दरमहा राशन देत असल्याने त्यामोबदल्यात तिच्या मुलीचे वरील आरोपी मार्फत लैंगिक शोषण होत असल्याचे माहित असताना देखिल तिला त्याचेकडे वेळोवेळी एकटीला राहण्यास पाठवुन सदर कृत्य करण्यास प्रोत्साहन दिले. म्हणुन पुरूष व महिला आरोपी यांच्या विरूध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ३६७/२०२५ बीएनएस कलम ६३, ६५(२), ३५१(२), ३(५), सह बालकांचे लैगिंक अपराधा पासुन सरंक्षण अधिनियम कलम ४, ६, १७ तसेच पिटा कलम ४, ५ अन्वये दिनांक ३०/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करीत आहे.

**सदर गुन्हयात १ महिला व १ पुरुष आरोपी यांना अटक केली असुन त्यांची मा.न्यायालयाने दिनांक ०४/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली आहे.**

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे), व सहा. पोलीस आयुक्त, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२३९ पारासुर, पोशि/४४४५ पाटील, मपोना/२९८४ भोये तसेच चालक पोहवा/मोहिते यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★★

